वर्ष : ०४ | अंक: १ | मुंबई, मंगळवार २८ नोव्हेंबर २०१७ ते ४ डिसेंबर २०१७ | पृष्ठ: ८

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 रुग्णांच्या लुटीला केंद्राचा चाप लागणार

3 → जीएसटीचा दिलासा प्रत्यक्षात मिळण्यासाठी...

हाफीजच्या सुटकेवरून अमेरिका संतप्त! ← 4




## दहावी बोर्डाच्या परीक्षेत अतिरिक्त गुणांची खैरात थांबणार

***मुंबई - दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत कला आणि क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने मिळणाऱ्या अतिरिक्त गुणांमुळे निर्माण होणारा गुणांचा फुगवटा अखेर फुटणार आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सरसकट गुण देण्याऐवजी, त्यांच्या कौशल्यानुसार टक्केवारीच्या धर्तीवर गुण देण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. जीआरच्या माध्यमातून हा निर्णय जाहीर करण्यात आला.***



शिक्षण विभागातर्फे कला, क्रीडा स्पर्धेत प्रवीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण दिले जातात. मात्र या निर्णयाच्या मदतीने मुंबईसह राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळविले होते. निकालाचा टक्का वाढविण्यासाठी या निर्णयाचा उपयोग करून घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर, शिक्षण विभागाने अतिरिक्त गुणांच्या निकषात बदल करण्याचा निर्णय घेतला.


## 'देवेंद्र फडणवीस व चंद्रकांत दादा हेच खरे सरकारचे लाभार्थी'

**विटा : मी लाभार्थीच्या खोट्या जाहिराती करून सरकार जनतेला बधीर करीत आहे. शेतकऱ्याच्या आजही मोठ्या समस्या आहेत. त्यामुळे जनता लाभार्थी झाली नाही. जनतेने मते व सत्ता दिल्याने सरकार लाभार्थी असल्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रकांत पाटील हेच खरे सरकारचे लाभार्थी झाले असल्याची घणाघाती टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.**

सांगली जिल्ह्यातील कार्वे (विटा) येथील शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री विजय शिवतारे, आ. अनिल बाबर, खासदार गजानन कीर्तीकर, नितीन बानूगडे-पाटील, जि. प. उपाध्यक्ष सुहास बाबर, अमोल बाबर, संजय विभूते उपस्थित होते. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात नवीन काही तरी घडेल म्हणून जनतेने सरकार बदलले. पण परिस्थिती बदलली नाही. ही परिस्थिती बदलायची असेल तर सांगली जिल्हा भगवा करा. मी महाराष्ट्र भगवा करतो. मी मुख्यमंत्री होणार नाही, पण एक दिवस मी शिवसेनेचा मुख्यमंत्री बसविणारच आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न लोकशाही मार्गाने सुटले नाहीत तर रस्त्यावर उतरणार आहे.

जनतेला अच्छे दिन येतील म्हणून बिजेपीला पाठींबा दिला. तीन वर्षे झाली. आता मी जेव्हा फिरतोय तेव्हा कळतंय की कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, अशी खिल्ली उडवून ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र आहे तेथेच आहे त्यापेक्षा वाईट परिस्थिती झाली आहे. तीन वर्षांत कशात काही नाही. १९९५ च्या जुन्याच पाणी योजना अजून पूर्ण करतोय.

सरकारला नीट सल्ले देणारे कोणी नाही. वीजदर कमी करण्यासाठी दिलेल्या मुख्यमंत्रीच्या आदेशाला अधिकारी केराची टोपली दाखवितात. हे शेतकऱ्यांचे सरकार आहे की नाही? शेतकरी हा राजा आहे. त्यांचा कोणी छळ करून स्वतःला राजा संजय असेल तर असले संस्थान खालसा केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपला दिला.





### सरकारने जबरदस्ती लादलेल्या जी.एस.टी. करामुळे

## लाखो लॉटरी विक्रेते बेरोजगार




गेली ५० वर्षे नियमित चाललेल्या पेपर लॉटरी तसेच संगणकीय लॉटरी विक्रेत्यांना सरकारने २८%जी.एस.टी कर लादल्यामूळे अनेक लॉटरी विक्रेत्यांची कुटुंबे बेकारीच्या छायेत वावरताहेत. वेळोवेळी जेव्हा ही भारतीय जनता पार्टीचे राज्य आले तेव्हा सर्वप्रथम लॉटरीवरच गदा आणण्याचा प्रयत्न केला गेला. कधी लॉटरी बंद करा तर कधी पोलिसांची धडपकड आणि आता नवीनच २८% जी.एस.टी कर. अशा अनेक त्रासातून लॉटरी विक्रेते रोजगार नसल्यामुळे आपला व्यवसाय शिस्तबद्ध करत होते. या माध्यमातून मिळणाऱ्या महसुलामुळे सरकारला मोठया प्रमाणात मदत मिळत होती. व लाखो लोकांचे कुटुंब यावर जगत होते. इतके असताना १२ % जी.एस.टी कर लावा अशी मागणी असुनही सरकारने २८% जी.एस.टी कर लावून लॉटरी विक्रेत्यांना देशोधडीला लावायचा प्रयत्न केला आहे.



यासाठी लॉटरी रोजगार बचाव महाकृत समितीने लॉटरीवरील २८% जी.एस.टी कर कमी करण्यासाठी व लॉटरी विक्रेत्याचा व्यवसाय वाचविण्यासाठी भारताचे अर्थमंत्री श्रीमान अरुण जेठली व केंद्रीय राज्यमंत्री श्री. शुक्लाजी तसेच जी. एस.टी कॉन्सिलचे रेव्हेन्यु सेक्रेटरी श्री. हसमुख अढीयाजी यांची दिल्ली येथे भेट घेऊन चर्चा केली. याप्रसंगी ऑनलाईन लॉटरी युनियनचे सर्व पक्षीय अध्यक्ष उपस्थित होते. लॉटरीवर लवकरात लवकर निर्णय घेऊ असे भारताचे अर्थमंत्री यांनी या अध्यक्षांच्या शिष्टमंडळाला शाश्वती दिली.

## महापौर मराठी भाषिकच असावा यासाठी 'मराठी एकीकरण समिती'चे सरकारला साकडे



मीरा भाईंदर पालिकेच्या महापौरपदी असलेल्या व्यक्तीस मराठी लिहिता बोलता वाचता येत नाही ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.

सभागृहातील कामकाजात त्यामुळे मराठी भाषा वापरली जात नाही. खुद्द महापौरांकडून जर असं होत असेल तर त्यातून एक चुकीचा संदेश जातो. मिरा भाईंदरच्या प्रथम नागरिकास आपल्या राज्याची राजभाषा आलीच पाहिजे त्यामुळे विद्यमान महापौर बदलावा व स्थानिक मराठी भाषिक महापौर मिळावा यासाठी रविवारी २६ नोव्हेंबर २०१७ रोजी भाईंदर स्थानकात मराठी एकीकरण समिती, मुंबई आणि मराठी बोला चळवळ हे संयुक्तपणे स्वाक्षरी मोहीम भाईंदर पूर्व स्थानकाबाहेर राबवण्यात आली.

नागरिकांच्या स्वाक्षरीचे हे पत्र मुख्यमंत्री, लोकायुक्त आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना देण्यात येईल.

## 'पीएफ'चीही दोन खाती 'ईपीएफओ'चा निर्णय




**नवी दिल्ली - संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे व्यवस्थापन करणाऱ्या 'एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन'तर्फे (ईपीएफओ) सदस्यांना आणखी एक पीएफ खाते देण्यात येणार आहे. त्यातील एक रोख रकमेचे खाते असून, दुसरे खाते 'ईटीएफ' असणार आहे. रोख खात्यात एकूण 'पीएफ'पैकी ८५ टक्के जमा होईल, तर 'ईटीएफ'मध्ये शेअर बाजारात गुंतवली जाणाऱ्या १५ टक्के रकमेचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच, ही रक्कम सदस्याला युनिटच्या स्वरूपात दिसणार आहे.**

'ईपीएफओ'चे केंद्रीय आयुक्त व्ही. पी. जॉय यांनी दिलेल्या माहितीनुसार 'ईपीएफओ'ने शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी अकाउंटिंग धोरणाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार आता सदस्याचे ईटीएफ खातेही असणार आहे. या खात्यामध्ये शेअर बाजारात गुंतवण्यात येणाऱ्या १५ टक्के रकमेप्रमाणे युनिट प्राप्त होणार आहेत. खात्यातून रक्कम काढताना खातेधारकाला त्या दिवसाच्या युनिटच्या किमतीप्रमाणे रक्कम प्राप्त होईल. 'ईटीएफ'च्या दुसऱ्या खात्यामुळे संबंधित खातेधारकाला प्राप्त युनिटची नेमकी किती किंमत आहे, हे समजण्यास मदत होणार आहे.

## एक्स्प्रेस वेवर १००च्या स्पीडनं गाडी चालवता येणार

**मुंबई - मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वाहनांसाठी प्रति तास ८० किलोमीटर असणारी वेगमर्यादा प्रति तास १०० किलोमीटर एवढी वाढवता येईल का, याविषयी चाचपणी सुरू आहे. मात्र अशा प्रकारे वेगमर्यादा वाढवण्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) नकारार्थी अभिप्राय दिला आहे.**



सध्या एक्स्प्रेस वेवर वाहनांना प्रति तास ८० किलोमीटर वेगाने जाण्याची परवानगी आहे. परंतु कोणतेही वाहन ही वेगमर्यादा पाळताना दिसत नाही. बहुसंख्य वाहने कमीत कमी १०० किलोमीटर प्रतितास या वेगानेच धावतात, ही वस्तुस्थिती आहे. मुळात एक्स्प्रेस वेवर ८० किलोमीटर प्रतितास वेगमर्यादा घालणे सयुक्तिक आहे का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. जगभरातील एक्स्प्रेस वेवर किमान मर्यादा १०० कि.मी. प्रति तास अशी आहे. त्यामुळे वेगमर्यादा वाढवावी का अशी चर्चा सुरू होती. एक्स्प्रेस वे संदर्भात काही दिवसांपूवी एमएसआरडीसी व गृह विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये एक बैठक झाली. या बैठकीत वेगमर्यादा वाढवण्याचा मुद्दा निघाला. मात्र एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी नकारार्थी अभिप्राय दिला.

याविषयी एमएसआरडीसीचे सह महाव्यवस्थापक किरण कुरूंदकर यांच्याकडे विचारणा केली असता, त्या बैठकीत हा मुद्दा चर्चेला आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'या बैठकीत मी उपस्थित नव्हतो. आमचे अधिकारी होते. वेगमर्यादा ८० वरून १०० किमी प्रति तास करावी का, असा मुद्दा उपस्थित झाला. परंतु आमच्यावतीने आम्ही त्यास नकार दिला', असे कुरूंदकर यांनी सांगितले. एक्स्प्रेस वेवर सर्वाधिक अपघात हे वेगमर्यादा ओलांडणे आणि मार्गिका बदल्याने होतात. त्यातही वेगमर्यादा ओलांडून होणाऱ्या अपघातांचे प्रमाण जास्त आहे. उन्हामुळे रस्त्याचा पृष्ठभाग कमालीचा तापलेला असतो. अशा वेळी ८० किमीची मर्यादा ओलांडून एखादे वाहन जात असेल तर अपघात होण्याचा धोका जास्त असतो. तापलेला पृष्ठभाग आणि वेगाने जाणाऱ्या वाहनांच्या टायरमध्ये घर्षण होऊन टायर फुटतात. त्यामुळे अपघात होत आहेत. असे असताना वेगमर्यादा वाढवणे सयुक्तिक नाही, असे आमचे मत असल्याचे त्यांनी सांगितले.



# रुग्णांच्या लुटीला लागणार केंद्राचा चाप

**मुंबई - गुरगाव येथील फोर्टिस रुग्णालयाने डेंग्यूने आजारी असलेल्या मुलीच्या उपचारासाठी आलेल्या १८ लाख रुपयांचे भरमसाठ बिल भरेपर्यंत तिचा मृतदेह पालकांकडे दिला नसल्याच्या घटनेची गंभीर दखल केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने घेतली आहे. खासगी रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी कोणतेही निकष पाळले जात नाही, अवाजवी बिल आकारण्यासह रुग्णांच्या हक्कांचे वारंवार उल्लंघनही होते. सर्वसामान्य रुग्णांचे आरोग्यहित जपा, असे स्पष्ट निर्देश केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदान यांनी फोर्टिस रुग्णालयातील त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून दिले आहेत.**

महाराष्ट्र सरकारने सरकारी व खासगी रुग्णालयांच्या नियमनासाठी, खासगी रुग्णालयांच्या दरांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी, रुग्ण हक्क सनद व तक्रार निवारण यंत्रणा असणारे क्लिनिकल एस्टॅब्लिश अ‍ॅक्ट नावाचे विधेयक तयार करण्यासाठी सन २०१३ व २०१४मध्ये प्रक्रिया राबवली होती. हे विधेयक तयार करण्यासाठी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. किशोर टावरी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये डॉक्टरांच्या विविध संघटना, जन आरोग्य अभियान व शासकीय अधिकारी यांचे प्रतिनिधी सहभागी होते. तसेच त्यानंतर लोकांची मते जाणून घेण्यासाठीची ही प्रक्रिया पार पडली आहे. विधी व न्याय विभागानेही या मसुद्याला हिरवा



कंदील दाखवला असतानाही मागील तीन वर्षे हा मसुदा तसाच पडून आहे. त्यामुळे खासगी रुग्णालयांवर कोणत्याही प्रकारचा चाप लावण्यात येत नाही, असा उद्वेग जन आरोग्य अभियानने नोंदवला आहे. केंद्र सरकारने निर्देश देऊनही प्रत्यक्षात त्याचे पालन झाले नाही, तर याची जबाबदारी कोण घेणार, असाही प्रश्न यानिमित्ताने अभियानचे डॉ. अभिजित मोरे यांनी उपस्थित केला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत केंद्रीय आरोग्य सचिव सुदान यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिले आहे. प्रत्येक राज्यात लहान तसेच बड्या रुग्णालयांतही रुग्णांची हेळसांड तसेच लुटण्याचे प्रकार घडतात. त्यामुळेच याप्रकरणी खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अनैतिक पद्धतीचा वापर करून रुग्णांना लुटू नये यासाठी अशा रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच वैद्यकीय आस्थापना कायदा अंमलात आणण्याचे व त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचा आग्रहही या पत्रात धरण्यात आला आहे.

## उत्पन्न कमी, खर्च वाढला



**मुंबई** - मुंबईत लोकल सेवेपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या बेस्ट उपक्रमाचा डोलारा पार ढासळला आहे. काही वर्षांपर्यंत दिवसाला सरासरी ४५ लाख प्रवासी संख्या असणाऱ्या बेस्टची दैनंदिन प्रवासी संख्या २८ ते ३० लाखांवर पोहोचली आहे. बेस्टचा तोटाही वाढत असून उत्पन्न कमी होत खर्चाचा आकडा वाढला आहे.

बेस्ट उपक्रमातील ४०,८०० अधिकारी-कर्मचाऱ्यांना मासिक वेतन देण्यासाठी बँकांकडून कर्ज घ्यावे लागत आहे. २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात बेस्टचा तोटा ८८० कोटी रुपये इतका दर्शविण्यात आला आहे. बिकट आर्थिक स्थिती असल्याने बेस्टचा गाडा चालविणे कठीण ठरत आहे. बेस्ट अधिकारी-कर्मचारी वर्गासाठी दर महिन्याला वेतन, निवृत्त होणाऱ्यांसाठी प्रॉव्हिडंड फंड आदींसाठी महिन्याला १८० कोटी रुपयांची तरतूद आवश्यक आहे. पण वाढत्या तोट्यामुळे उपक्रमाला वेतनासाठी बँकांपुढे हात पसरावे लागत आहेत. आर्थिक प्रतिष्ठा लयास गेलेल्या बेस्टला केवळ वेतनासाठी म्हणून दर महिन्याला सुमारे १०० कोटी रुपये कर्ज घ्यावे लागत आहे. एका वर्षात ही रक्कम १,२०० कोटी रुपयांवर जाणार आहे.

# अजूनही प्लास्टिकबंदीचा घोळ संपेना!

## तपानंतरही अर्निबध वापर, राज्यसरकारकडून पुन्हा नव्याने मुहूर्त

**मुंबई** - मुंबईतील २६ जुलैच्या अतिवृष्टीनंतर ५० मायक्रॉनपेक्षा कमी वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांवर महाराष्ट्र सरकारची बंदी.. ४ फेब्रुवारी २०११च्या केंद्र सरकारच्या आदेशानुसार ४० मायक्रॉनपेक्षा कमी वजनाच्या पिशव्यांवर बंदी.. १८ मार्च २०१६ मध्ये केंद्र सरकारच्या आदेशात बदल आणि ५० मायक्रॉनपेक्षा कमी वजनाच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी.. पुढील वर्षी गुढीपाडव्यापासून मंत्रालय आणि शासकीय कार्यालयांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या आणि बाटल्यांच्या वापरांवर बंदी आणि टप्प्याटप्प्याने बंदीची व्याप्ती वाढविण्याची घोषणा. गेल्या १२ वर्षांत घोषणा झाल्या, आदेश निघाले, पण प्लास्टिकबंदीची अंमलबजावणी झाली नाही. अता नव्याने मुहूर्त काढण्यात आला आहे. हा आदेश कागदावरच राहणार का, असा प्रश्न साहजिकच उपस्थित केला जातो.

गुढीपाडव्यापासून मंत्रालय व राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या आणि बाटल्यांवर बंदीची घोषणा पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी केली आहे. टप्प्याटप्प्याने या बंदीची व्याप्ती वाढविण्याची रामदासभाईंची योजना आहे. अगदी दुधाच्या पिशव्यांवर बंदी घालण्याचा पर्यावरण




विभागाचा प्रस्ताव आहे. शिवसेनेच्या मंत्र्याने एखादी घोषणा केल्यास त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लगेचच मान्यता देत नाहीत, असा गेल्या तीन वर्षांतील अनुभव आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांनी केलेल्या घोषणा प्रत्यक्षात येण्यास मंत्रालय झगडावे लागल्याची उदाहरणे आहेत. प्लास्टिकबंदीची घोषणा रामदासभाईंनी करताच त्याची प्रतिक्रिया उमटू लागली. प्लास्टिक उद्योगाकडून प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. या उद्योगात भाजपशी जवळीक साधणारे अनेक जण असल्याने भाजपकडून बंदीबाबत कशी पावले टाकली जातात, हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

केंद्र सरकारने २०११ मध्ये लागू केलेल्या आदेशात ४० मायक्रॉनपेक्षा कमी वजनाच्या प्लास्टिक पिशव्या वापरण्यावर बंदी घातली. म्हणजेच केंद्र आणि महाराष्ट्र सरकारच्या आदेशांमध्ये तफावत निर्माण झाली. गेल्या वर्षी मार्चमध्ये केंद्राने आदेशात बदल केला आणि ५० मायक्रॉनची अट घातली.

या बंदीचे चांगले परिणामही जाणवल्याचे पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. फक्त आदेशाची कठोरपणे अंमलबजावणी झाली नाही याची कबुली ते देतात. राज्यात आता शासकीय कार्यालयांमध्ये प्लास्टिक वापरावर बंदीचा फतवा निघाला आहे. पाण्याच्या बाटल्यांवर बंदी घालण्यात आली नाही. पुढे जाऊन दुधाच्या पिशव्यांवर बंदी येणार आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता हा निर्णय चांगला असला तरी सामान्य जनतेचे हाल होणार नाहीत याचीही खबरदारी शासनाला घ्यावी लागणार आहे.

# दहावी, बारावीच्या परीक्षेला उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाही?

**शासनाच्या समितीचा प्रस्ताव; प्रश्नपत्रिका फुटण्याचे सत्र रोखण्यासाठी उपाय**

**मुंबई** - दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रश्नपत्रिका फुटण्याचे सत्र गेल्या वर्षी गाजल्यानंतर आता परीक्षेसाठी सरीस उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश न देण्याचा निर्णय घेण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे राज्यसेवा आयोगाच्या परीक्षांप्रमाणे प्रश्नपत्रिकांना आवरण घालण्याचा (मास्किंग) प्रस्तावही शासनापुढे ठेवण्यात आला आहे.

गेल्या वर्षी बारावीच्या परीक्षेत मुंबई विभागात प्रश्नपत्रिका फुटल्या. दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी दहा मिनिटे आधी प्रश्नपत्रिका देण्यात येतात. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच व्हॉट्स अ‍ॅपवरून प्रश्नपत्रिका सगळीकडे पसरल्या होत्या. या प्रकरणानंतर प्रश्नपत्रिका फुटू नयेत, परीक्षा अधिक चांगल्या पद्धतीने व्हाव्यात यासाठी उपाय करण्यासाठी शासनाने समिती नेमली होती. राज्याचे शिक्षण आयुक्त, राज्य मंडळाचे अध्यक्ष, माध्यमिक शिक्षण संचालक, पोलीस अधिकारी या समितीचे सदस्य होते. या समितीने आपला अहवाल तयार केला आहे.

'नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालात काही बदल आवश्यक वाटले. ते करून सुधारित प्रस्ताव शासनाकडे आला की यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल. परीक्षेला उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना सरसकट प्रवेश नाकारण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांना काही रास्त कारणास्तव उशीर झाला असेल तर



त्याचा विचार नक्कीच करण्यात येईल. उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र बसवून त्यांनी दिलेल्या कारणाची शहानिशा करून त्यांच्याबाबत निर्णय घेता येऊ शकेल. याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. आलेल्या प्रस्तावांवर विचार करण्यात येत आहे, असे तावडे म्हणाले.

## हळदीचे फोटोसेशन पडले महागात, लग्नमंडपातून २४ तोळ्यांचे दागिने चोरीला



**मुंबई** : जवळच्या नातेवाइकाच्या लग्नात उठून दिसण्यासाठी साने कुटुंबाने घरातील सर्व दागिने सोबत घेऊन लग्नमंडप गाठला. लग्नमंडपात हळदीच्या कार्यक्रमात फॅमिली फोटो काढण्यासाठी दागिन्यांची बॅग शेजारच्या खुर्चीत ठेवली. हळदीचे फोटोसेशन सुरू असताना सभागृहातून बोरीवलीच्या या साने कुटुंबाचे सुमारे २४ तोळ्यांचे दागिने चोरीला गेल्याची खळबळजनक घटना दादरमध्ये घडली.

बोरीवली परिसरात भक्ती मिराज साने या कुटुंबीयांसोबत राहतात. दादरच्या वीर सावरकर नगर परिसरातील सभागृहात जवळच्या नातेवाइकाचे लग्न असल्याने ते तेथे गेले. हळदीच्या कार्यक्रमात फॅमिली फोटो काढण्यासाठी त्यांची धडपड सुरू झाली. अशात त्यांनी घरातून निघतेवेळी सोबत घेतलेली बॅग जवळच्या खुर्चीत ठेवली. याच बॅगेतील पर्समध्ये त्यांचे २४ तोळ्यांचे दागिने होते. फोटोसेशन उरकल्यानंतर त्यांना बॅगेची आठवण झाली. तोपर्यंत बॅगेतून दागिने गायब झाले होते. चोरी झाल्याचे लक्षात येताच लग्नमंडपात धावपळ उडाली. दागिन्यांची शोधाशोध सुरू झाली.

## विमानतळ विकास कंपनीत कोट्यवधींचा घोटाळा



**मुंबई** - स्वत: संचालक असलेल्या कंपनीच्या सहयोगी कंपनीवर मेहरनजर दाखवीत, सरकारी नियम पायदळी तुडवून विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांसह अधिकाऱ्यांनी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे अप्पर मुख्य सचिव मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. या घोटाळ्यातील दोषी अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

विमानतळ विकास कंपनीत सन २००८ ते २०१२ च्या दरम्यान हा घोटाळा झालेला आहे. कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी आपल्या पदाचा गैरवापर करीत मर्जीतील कंपन्यांवर मेहरनजर दाखवीत त्यांना कमी किमतीत जागा उपलब्ध करून दिल्या. चुकीच्या ठिकाणी प्रकल्प उभारण्यास मान्यता दिली. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होण्यापूर्वीच कंपन्यांना मिहानमधील जमिनीचा ताबा दिला. काही कंपन्यांना बेकायदेशीर बँक हमी दिल्याच्या प्रकरणांच्या माध्यमातून या कंपनीत झालेल्या कोट्यवधींच्या घोटाळ्याचे पितळ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी उघड केले होते.

कंपनीतील अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरीत्या मेसर्स रेटॉक्स बिल्डर्स यांना विजया बँकेची १०५ कोटींची काऊंटर बँक हमी दिली, तर विमानतळ विकास कंपनीने मेसर्स रेटॉक्स बिल्डर्स आणि चौरंगी बिल्डर्स यांच्याकडून कोणतीही बँक हमी न घेता ३२.१३ कोटींचे अग्रिम दिले. एवढेच नव्हे तर ९० टक्के प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होण्याआधी करार डावलून विकासकाला मिहानमधील जमिनीचा ताबा दिल्याचा तसेच अन्य एका कंपनीस रेडिमिक्स प्लँटसाठी भाडेकरार न करताच सहा एकर जमीन सात वर्षांसाठी दिल्याचा ठपकाही कॅगने अहवालात ठेवला होता. अशाच प्रकारे अन्य एका प्रकरणात एससीसीईएल कंपनीस मूल्य धोरणापेक्षा कमी दराने भूखंड दिल्याने झालेले कोट्यवधींचे नुकसान, कोळशावर आधारित प्रकल्प उभारण्यास मनाई असल्याची कल्पना होती. तरीही अयोग्य ठिकाणी प्रकल्प उभारण्याच्या नियोजनावर झालेला चुकीचा खर्च, जळगाव विमानतळ उभारणीत सल्लामसलतीच्या कामावर केलेला कोट्यवधींचा खर्च आदी प्रकरणांतही कॅगने विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक व अन्य अधिकाऱ्यांना जबाबदार धरले होते.

# सज्जा आणि गच्ची घरात घेण्याला आता सशर्त परवानगी!

**२०१२ पूर्वीच्या इमारतींतील रहिवाशांना दिलासा**

**मुंबई** – 'फंजिबल चटईक्षेत्रफळ' अस्तित्वात येण्याआधी ज्या रहिवाशांनी सज्जा (बाल्कनी), गच्ची, फुलझाडे लावण्याची जागा (फ्लॉवर बेड) तसेच चटईक्षेत्रफळातून मुक्त असलेली जागा सदनिकेच्या जागेत समाविष्ट केली असेल त्यांना आता ही जागा अधिकृतपणे वापरता येणार आहे. यासाठी गृहनिर्माण संस्था वा विकासकामार्फत महापालिकेकडे प्रस्ताव पाठवून प्रीमिअम भरून या अतिरिक्त जागेचा लाभ उठविता येणार आहे. मुंबई महापालिकेने अलीकडे जारी केलेल्या या परिपत्रकामुळे हजारो नागरिकांची पालिकेच्या कारवाईतून सुटका झाली आहे.

जानेवारी २०१२ पासून फंजिबल चटईक्षेत्रफळ अस्तित्वात आले. बाल्कनी, सदनिकेची गच्ची, फ्लॉवर बेड आदी पूर्वी चटईक्षेत्रफळातून मुक्त असलेल्या जागा चटईक्षेत्रफळात गणल्या जाऊ लागल्या. पूर्वीच्या इमारतींमध्ये अनेकांनी अशा जागा वापरण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे सदनिकेत अनधिकृत बदल केल्याबद्दल पालिकेकडून या रहिवाशांना नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. या रहिवाशांवर कारवाईची टांगती तलवार सतत होती. आता मात्र महापालिकेने २१ नोव्हेंबर रोजी परिपत्रक काढून हे बांधकाम अधिकृत करून देण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

बेकायदा इमारती अधिकृत करण्याबाबत सरकारने ७ ऑक्टोबर २०१७ रोजी अधिसूचना जारी केली होती. त्यासाठी महाराष्ट्र नगररचना कायद्यात सुधारणा



करण्यात आली. कुठली अनधिकृत बांधकामे अधिकृत होऊ शकतात, याबाबत त्यात स्पष्टीकरण देण्यात आले आहे. या अधिसूचनेला अनुसरून मुंबई महापालिकेने परिपत्रक जारी केले आहे. जानेवारी २०१२ पूर्वीच्या ज्या इमारतींना निवासयोग्य प्रमाणपत्र मिळाले आहे त्यांना वा प्रगतिपथावर असलेल्या प्रकल्पात गृहनिर्माण संस्था किंवा विकासकामार्फत प्रस्ताव देऊन ही बांधकामे अधिकृत करता येतील.


खादी ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME
(Central Govt.)
नंदाई महिला संगम ट्रस्ट
१०६, सोनम शॉपिंग सेंटर
पहिला
भुजला, गोल्डन नेस्ट सर्कल, भाईंदर (पू)
दिनांक 20/11/2017 पासून आवेदन पत्र भरले जातील बॅच--१११ न
सत्र प्रारंभ तिथि 24/11/2017 उद्योजक बनण्या साठी प्रशिक्षण सफल उद्योजक होण्याची संधी

| | |
|---|---|
| (फॅन्सी बॅग बनवणेसत्र) | (डिजाईन पावडरपेन्टिंग, |
| बॅच अवधि - १ महिना | लिक्विड डिटर्जंट, फिनाईल |
| १० पेटर्न शिकवले जातील यात- | ईडलाँग बनवणे) |
| न्यूज बॅग, प्रवासी बॅग, बटुए, गाधी बॅग, साईडपाई, सखोला बॅग | सत्रअवधी - दोन आठवडे प्रात्यक्षिकात महिला सर्व वस्तु शिकवल्या जातील, दर |
| एम्ब्रायडरी बॅग विभिन्न प्रकारचा | काढणे, विक्री व्यवसाय प्रारंभ करण्या साठी माहिती दिली जाईल |
| कापडा वापरून पॅटर्न | संपर्क - |
| कटींग, शिलाई, दर काढणे, व विक्री संबंधित माहिती दिली जाईल. | 9870682989, 8652408930 |
| संपर्क - 8652408930 | |
| PMEGP स्कीम ची माहिती दिली जाईल | PMEGP स्कीम ची माहिती दिली जाईल |


# वाहनचालक गाडीत असताना गाडी टोईंग करता येणार नाही; नवी नियमावली जारी

**मुंबई** - काही दिवसांपूर्वी मुंबईच्या मालाड परिसरात महिला आणि तिचा लहान मुलगा कारमध्येच बसले असताना वाहतूक पोलिसांकडून त्यांची गाडी उचलून नेण्याचा प्रकार घडला होता. या घटनेनंतर दोन्ही पक्षांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले होते. सुरुवातीला ही गोष्ट समोर आल्यानंतर वाहतूक पोलिसांना प्रचंड टीकेला सामोरे जावे लागले होते. मात्र, काही दिवसांतच या घटनेची दुसरी बाजू दाखवणारा व्हिडिओ समोर आला. यामध्ये संबंधित महिलेची चूक असल्याचेही स्पष्ट झाले.



त्यामुळे भविष्यात असा कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी वाहतूक विभागाकडून टोईंगबाबत नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. यामध्ये अनेक नव्या नियमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. एखादे वाहन उचलत असताना त्या वाहनाचा मालक तेथे आल्यास दंडाची रक्कम आणि टोईंग शुल्क आकारून ते वाहन सोडण्यात यावे. तसेच गाडी टो करण्यापूर्वी ध्वनिक्षेपकावरुन गाडी काढण्यासाठी एकदा सूचनाही देण्यात येणार आहे. याशिवाय, एखादी गाडी नो-पार्किंग क्षेत्रात उभी असेल, पण गाडीचा चालक आतमध्ये बसला असेल तर ती गाडी उचलू नये. तसेच या गाड्या उचलण्यासाठी पोलिसांना मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी संबंधित वाहनाच्या मालकाशी गैरवर्तन किंवा उद्धटपणे वागू नये, असे या परिपत्रकात म्हटले आहे.

## स्वयंम दिप भव

तथागत भगवान गौतम बुध्दाने ३००० हजार वर्षापूर्वी समस्त मानवाला सांगितले आहे. त्यांच्या महान संदेशाला आपण अनुसराने तर मानवाचा विकास झाल्याशिवाय रहाणार नाही आयुष्यमान अंकुशजी मालुसरे कामगार नेता यांनी २७ नोव्हेंबर २००७ मध्ये निर्भय भारत सामाजिक संघटनेची स्थापना केली. अत्यंत बिकट परिस्थितून मार्ग काढीत, सकष्टाने आज पर्यंत गरीब कामगार यांच्या न्याय हक्कासाठी लढत आहेत. त्यांनी अनेक संघटना युनियन स्थापन केल्या आहेत. निर्भय भारत सामाजिक संघटना, श्रमिक एकता संघटना, मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन कर्मचारी संघटना, निर्भय भारत रियल इस्टेट प्रोपर्टी डिलर्स असो. मिरा-भाईंदर स्टुडिओ ओनर्स अ‍ॅन्ड फोटोग्राफर असो., मिरा-भाईंदर मिठाई (स्टिट) दुकानदार असो., स्टील उद्योग जनरल कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य बिल्डींग सफाई कामगार संघटना, मिरा-भाईंदर सलून असो., मिरा-भाईंदर फेरीवाला (हॉकर्स) मजूर संघटना, माजी सैनिक कल्याणकारी संस्था महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक (सोसायटी कामगार) संघटना, मिरा-भाईंदर रसवंती गृह संघटना, मिरा-भाईंदर माथाडी कामगार संघटना, घरेलु कामगार संघटना महाराष्ट्र राज्य, इमारत बांधकाम कामगार एवम नाका कामगार संघटना, मिरा-भाईंदर सेवा निवृत्त कर्मचारी ज्येष्ठ नागरीक सेवा संस्था, अपंग कल्याणकारी सेवाभावी संघटना, निर्भय भारत स्वयंरोजगार महिला बचत गट संघ, खादी-ग्रामोद्योग आयोग नंदाई महिला संगम ट्रस्ट-संघरक्षक, महामानव प्रतिष्ठान संघरक्षक, निर्भय भारत महिला विभाग, निर्भय भारत युवक संघटना, निर्भय भारत दहिसर विधान सभा संघटना, निर्भय भारत पुणे-भोर सामाजिक संघटना, निर्भय भारत पालघर संघटना, निर्भय भारत रत्नागिरी दापोली कराड सातारा संघटना, अशा अनेक संघटना तळगाळातील नागरिकांसाठी काम करीत आहेत. तथागत भगवान गौतम बुध्दा आपल्याला सुखमय करो अशी प्रार्थना.

-अनिल कसारे-पत्रकार

# कळव्यात 'घनदाट' झोपड्यांचे जाळे

## वनविभागाच्या जागेवर २० हजार झोपड्यांचे अतिक्रमण

**मुंबई - वनविभागाच्या जागेवर झोपड्यांचा विळखा पडला असून स्थानिक गुंड, भूमाफिया वनजमिनीवर झोपड्या उभारत जागा गिळंकृत करत असूनही वनविभागाचे लक्ष नाही. झोपड्यांवर थातूरमातूर कारवाई होते आणि पुन्हा झोपड्या उभ्या राहतात. वनविभागाच्या कळवा परिमंडळात वनजमिनीवर २० हजार झोपड्यांचे अतिक्रमण झाल्याचे खुद्द वन अधिकारीच सांगतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत असताना वनविभाग काय करत होते, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

वनविभागाच्या कळवा परिमंडळात कळवा, मुंब्रा, शीळ, रबाळे आदी चार विभाग येतात. या परिमंडळाअंतर्गत वनविभागाची एकूण १ हजार ६८८ हेक्टर जमीन आहे. मात्र यातील २० ते २५ हेक्टरवर अतिक्रमण झाल्याचे वनविभागाचे म्हणणे आहे. हल्लीहून हा परिसर अतिक्रमणमुक्त करण्याचे प्रयत्न वनविभागाने सुरू केले आहेत. झोपड्यामुक्त केलेल्या वनजमिनीवर तर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. मात्र, अतिक्रमण रोखण्यासाठी वनविभागाकडून वेळीच पावले उचलली जात नाहीत. परिणामी भूमाफियांचे अधिकच फावत असल्याचे बोलले जात आहे.

वनविभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणावर झोपड्या उभ्या राहत असून कोणाचेही नियंत्रण नाही. उभारलेल्या झोपड्या गरजवंतांना काही हजार रुपयांमध्ये भूमाफिया विकतात. सुरुवातीला कच्च्या असलेल्या झोपड्या नंतर पक्क्या विटांच्या बांधल्या जातात.

## संपादकीय...

# जीएसटीचा दिलासा प्रत्यक्षात मिळण्यासाठी...



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

इडली नरम-मिसळ गरम, रवा आता मनसोक्त. कारण, अर्थमंत्र्यांनी रेस्टॉरंटना लागू असलेला वस्तू आणि सेवा कर कमी केला आहे. वातानुकूलित रेस्टॉरंटना १८ टक्के दराने तर अन्य उपाहारगृहांत १२ टक्के दराने जीएसटी लागू होता; आता हा दर कमी करून ५ टक्के एवढा केला आहे; परंतु कर भरणाऱ्या रेस्टॉरंटना कच्चा माल, सेवा-सुविधा यावर भरलेल्या जीएसटीची वजावट मिळणार नाही. या बदलामुळे रेस्टारंट-उपाहारगृहांमधील जेवण आणि खानपान स्वस्त होईल आणि खवैय्यांना खाण्यावर आडवा हात मारता येईल. पंचतारांकित हॉटेलमधील निवासाच्या दरावर लागू असलेला जीएसटी २८ टक्क्यांवरून कमी करून १८ टक्के केला आहे. जीएसटी मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत कायद्यासंबंधी आणि कराच्या दराविषयी विचार विनिमय झाला. बैठकीमध्ये अनेकविध जाचक वाटणाऱ्या तरतुदी शिथील करण्यात आल्या. सवलतपात्र लहान व्यापार-व्यवसायांच्या व्याप्तीमध्ये वाढ केली आहे. ग्राहकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे शेकडो वस्तू आणि सेवांवरील जीएसटी करामध्ये कपात केली आहे. या सर्व उपाययोजनांचा एकत्रित परिणाम म्हणजे व्यापारी आणि उद्योजकांवरील कागदपत्र आणि कारकुनी कामाचा भार हलका होईल. वस्तू आणि सेवा घेणाऱ्या ग्राहकांना त्यासाठी काही प्रमाणामध्ये कमी पैसे मोजावे लागतील. घटलेल्या करांमुळे केंद्र आणि राज्य सरकारांच्या तिजोरीला २०,००० कोटी रुपयांची झळ सोसावी लागेल. सर्व राज्यांना झालेली कराची घट पुढील पाच वर्षे केंद्र सरकारला भरून घ्यायची आहे. त्यामुळे अंतिमतः ही घट केंद्र सरकारच्या राजस्वामध्येच होईल. जीएसटीच्या मंडळाने ग्राहकांना दिलेली सवलत मोठी आहे. १७८ वस्तू आणि सेवांवर २८ टक्क्यांऐवजी १८ टक्के जीएसटी, दोन वस्तूंवर २८ टक्क्यांवरून १२ टक्के, १३ वस्तूंवर १८ टक्क्यांवरून १२ टक्के, सहा वस्तूंवर १८ टक्क्यांवरून ५ टक्के, आठ वस्तूंवर १२ टक्क्यांवरून ५ टक्के आणि इतर ५ टक्क्यांवरून ० टक्के अशी जीएसटीच्या दरामधील कपात आहे.

जीएसटी कायद्यानुसार व्यापारी आणि व्यावसायिकांना वर्षाला सुमारे ३७ विवरणपत्रक इलेक्ट्रॉनिक माध्यमाने सादर करणे सक्तीचे आहे. तसे न केल्यास किंवा दिरंगाई झाल्यास दंड आणि व्याजाच्या जबर परिणामांना सामोरे जावे लागते. त्यातच सरकारची जीएसटीची विवरण पत्रके सादर करावयाची संगणक प्रणाली अत्यंत वेळखाऊ आणि जिकिरीची असून त्यामध्ये सुलभता नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांना तज्ज्ञ व्यक्तीवर अवलंबून राहावे लागते. या सर्व प्रक्रियेमधील दोषांमुळे श्रम, वेळ आणि पैसा यांचा अपव्यय होतो. तसेच, आयात केलेल्या वस्तू आणि सेवांवरील दिलेल्या कराची वजावट मिळण्यास आणि विक्रीचे पैसे वसूल होण्यामधील दिरंगाईमुळे व्यवसायासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाच्या रकमेत मोठी वाढ होऊन व्याजाचादेखील फटका बसत आहे. अशा अनेक मुद्द्यांवरून व्यापारीवर्गाने जीएसटी प्रणालीबाबतचा असंतोष मोठ्या प्रमाणावर व्यक्त केला होता. जीएसटी मंडळाने व्यापाऱ्यांच्या असंतोषाची दखल घेत त्यांना मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. संगणक प्रणालीमधील त्रुटी अखंडित वीज आणि कनेक्टिव्हिटीचा अभाव अशा अनेक कारणांनी विवरणपत्र भरण्यास उशीर होतो. यासाठी प्रत्येक दिवसाला रुपये २०० असा भुर्दंड सोसावा लागत होता. त्यामध्ये मोठी सूट दिली आहे. आता, ऑक्टोबर २०१७ नंतर विवरणपत्र सादर करण्यासाठी उशीर झाल्यास पडणारा आकार ५० रुपये असेल आणि देय कर नसल्यास हा आकार रुपये २० दर दिवशी एवढा कमी पडेल. ऑगस्ट आणि सप्टेंबरसाठी विलंब शुल्क माफ आहे. मार्च २०१८ पर्यंत जीएसटी सर ३ बी हेच विवरणपत्र महिना संपल्यानंतर २० दिवसांनी भरावे लागेल. परंतु, वार्षिक उलाढाल रुपये १.५० कोटीपर्यंत असल्यास त्यांना मात्र तिमाही विवरणपत्र भरण्याची सक्ती नाही. आता प्रश्न उरतो तो या सवलती दिल्यानंतर केंद्र सरकार राज्यांमध्ये झालेली घट कशी भरून काढणार. याबाबत सरकारतर्फे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. जीएसटीचे कर दर कमी झाल्याने वस्तू आणि सेवांच्या किमतीमध्ये घट होईल आणि किमती कमी झाल्याने ग्राहकांची क्रयशक्ती वाढून मागणी आणि विक्री यामध्ये वाढ होईल. व्यापार आणि उलाढाल वाढून काही कालावधीमध्ये सरकारची गंगाजळी वाढेल आणि घट भरून निघेल.





# 'मूडी'चे अर्थकारण व शेतकरी आत्महत्यांचे वास्तव



मूडी या अर्थकारणाचे सर्वेक्षण करणा-या जागतिक यंत्रणेने भारताचा आर्थिक विकासदर चांगला असल्याचे प्रशस्तीपत्र दिल्याच्या दुस-याच दिवशी महाराष्ट्र या देशातील एकाच राज्यात दरदिवशी आठ शेतकरी गळफास लावून आत्महत्या करतात ही बातमी सरकारचा मूड घालविणारी आणि जनतेला सत्याच्या जवळ नेणारी आहे. सरकार किंवा त्यातले जेटली नावाचे मंत्री जागतिक संघटनांना बनवू शकतील. त्यांना आपल्या सोयीची आकडेवारी पाठवून आपली पाठ थोपटून घेऊ शकतील आणि भाजपाचे ढोलताशेवाले त्यावर एकदोन दिवस मिरवणुका काढू शकतील. पण दरदिवशी एकेका गावात निघणा-या शेतक-यांच्या अंत्ययात्रांचे वास्तव त्यामुळे कसे झाकले जाऊ शकेल? सरकारी सत्य आणि जनतेचे सत्य असे सत्याचे दोन अनुभव देश सध्या घेत आहे. त्यातला सरकारचा अनुभव संशयास्पद तर जनतेचा खरा आहे. शेतक-यांचे कर्ज माफ करण्यात आल्याचे सरकारांनी सांगितले. प्रत्यक्षात ते किती थोड्या शेतक-यांचे माफ झाले हे दुस-याच दिवशी प्रकाशित झाले. आपण जे सांगतो त्याचे खरेपण निदान दोन दिवस तरी टिकून राहील याची काळजी अशावेळी सरकारनेच घ्यायला पाहिजे. लोक बोलत नाहीत, सारे काही पचवून शांत राहतात याचा अर्थ आपले असत्य खपले असा सरकारांनी घेता कामा नये आणि मूडीसारख्या ज्या दूरवरच्या यंत्रणांनीही सरकारचे सत्य जरा पडताळूनच पाहिले पाहिजे. जागतिक स्तरावर काम करताना या यंत्रणा त्यांना सरकारने पुरविलेल्या कागदोपत्री माहितीवर विसंबून राहूनच त्यांचे निष्कर्ष जाहीर करतात. समाजातल्या कोणत्या स्तरापर्यंत त्यातले काय व किती पोहचले याची भ्रांत त्याही ठेवीत नाहीत. त्यामुळे सरकारी उत्पादन वाढले असे त्या सांगत असल्या तरी त्या उत्पादनाचा किती भाग जनतेच्या वाट्याला आला याची सत्यता त्या कशी सांगणार? एकेकाळी लोकशाही सरकारे निवडणुका जिंकायला युद्ध तंत्राचा वापर करीत. निवडणूक जवळ आली की शेजारच्या दुबळ्या देशाशी कुरापत काढून त्याला कसला तरी धडा शिकवीत आणि त्या बळावर आपल्या पराक्रमाची जाहिरात करून निवडणुका जिंकीत. आताचे तंत्र प्रशस्तीपत्रे मिळविण्याचे आहे. गुजरात विधानसभेची निवडणूक आली की, स्वतःच्या देशात बदनाम असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मोदींची तारीफ करतात आणि भारत हा आपला विश्वसनीय देश असल्याचे सांगतात. प्रत्यक्षात पाकिस्तानला लष्करी मदत करून भारताशी मैत्री असल्याचे जगाला सांगणारा हा प्रकार आहे. याच काळात चीनचे शी जिनपिंग अरुणाचलवरचा हक्क मागे न घेता मनिलामध्ये मोदींवर स्तुतिसुमने उधळतात आणि त्यातली थोडी सुमने मोदी अहमदाबादेत आणतात. आंतरराष्ट्रीय राजकारण हे सरकारांचे राजकारण असते. तसे त्याचे अर्थकारणही सरकारीच असते. त्याचा जनतेच्या प्रत्यक्ष जीवनाशी फार थोडा संबंध असतो. त्यामुळे देशात दरदिवशी डझनांनी लोक आत्महत्या करीत असले तरी त्याचे अर्थकारण सबळ असल्याचेच तिकडे सांगितले जाणार. जेथे धार्मिक व जातीय अंधश्रद्धा मोठ्या असतात त्यात ही आर्थिक बुवाबाजीही खपणारी असते. जागतिक संस्थांना त्याचमुळे सरकारी पातळीवर न थांबता जनतेपर्यंत यावे लागेल किंवा जनतेत काम करणाऱ्या संस्था-संघटनांना याविषयीचे वास्तव तिथवर पोहचवावे लागेल. यातले काहीही उद्या झाले नाही तरी जनतेला तिच्या खऱ्या अडचणींची जाणीव होतच असते. ही दुखरी जाणीवच तिला निवडणुकीत सक्रिय करीत असते. त्यासाठी मूडीची फसवणूक कामी येत नाही आणि ट्रम्पचे सर्टिफिकेटही मोलाचे ठरत नाही. जनतेची ही जाणीवच लोकशाहीची खरी ताकद असते.

# बेघर होऊ या भीतीने लाखो मुंबईकर धोकादायक इमारतींमध्ये मृत्यूच्या छायेत



मुंबईत डोक्यावर छप्पर असणे हेच मोठ्या भाग्याचे मानले जाते. हक्काचा निवारा हिरावला तर कायमचे बेघर होऊ या भीतीने हजारो धोकादायक इमारतींमध्ये लाखो मुंबईकर मृत्यूच्या छायेत दिवस काढत आहेत. अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट सक्तीचे झाल्यावर बनावट ऑडिट अहवालाद्वारे इमारतींच्या पुनर्विकासासाठी रहिवाशांवर दबाव टाकणे इमारत मालकांनी सुरू केले. या मनमानीला चाप लावून धोकादायक इमारतींच्या विकासाला गती देणारे धोरण अखेर मुंबई महापालिकेने आणले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) अनुसार २००१ ते २०१५ या कालावधीत देशातील इमारत दुर्घटनांमध्ये ३८ हजार ३६३ लोकांचा मृत्यू झाला. गेल्या तीन महिन्यांतच घाटकोपर आणि भेंडी बाजारातील इमारत दुर्घटनांत पन्नासहून अधिक बळी गेले. सप्टेंबर २०१३मध्ये डॉकयार्ड इमारत दुर्घटनेने काळजाचा ठोका चुकविला. त्यात ६१ रहिवाशांचा बळी गेला. त्यानंतर ३० वर्षांवरील सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट सक्तीचे करण्यात आले. परंतु बिल्डरांनी प्रशासनातील अधिका-यांना हाताशी धरून खोटे अहवाल बनवण्याचा नवा धंदा सुरू केला. जागरूक रहिवाशांनी स्वतंत्र स्ट्रक्चरल ऑडिट करीत इमारत मालकांचे बिंग फोडले. यामुळे दोन ऑडिट अहवालाचा वाद निर्माण झाला. हा तिढा सोडविण्यासाठी पालिका आयुक्त अजय मेहता यांनी उचललेले पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे. नवीन धोरणामुळे तीन प्रमुख प्रश्न सुटणार आहेत. इमारत मालकाने पालिकेकडे जमा केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल संकेतस्थळाच्या माध्यमातून रहिवाशांपर्यंत पोहोचणार आहे. या पारदर्शकतेमुळे दोन ऑडिट अहवालांचा गोंधळ संपणार आहे. रहिवाशांचा काही आक्षेप असल्यास त्यांना तत्काळ दाद मागता येणार आहे. दुसरे म्हणजे, जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना जुन्या घराच्या क्षेत्रफळाइतकेच क्षेत्रफळ देणे महापालिकेने बंधनकारक केले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इमारत दुर्घटनेसाठी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. सुस्थितीत असल्याचा अहवाल दिल्यानंतर ती इमारत पडल्यास संबंधित स्ट्रक्चरल अभियंत्याची नोंदणी रद्द होणार आहे. डॉकयार्ड इमारत दुर्घटनेनंतर पालिकेच्या अभियंत्यांवर कारवाई झाली. मात्र या इमारतीच्या दुरुस्तीच्या फाईलवर दीड वर्ष कोणताही निर्णय न घेणाऱ्या सनदी अधिकाऱ्याला अभय मिळाले होते. कायद्यातील पळवाटा शोधून सहीसलामत सुटणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांभोवतीही फास आवळण्याची तरतूद या धोरणात होणे आवश्यक आहे.

# बेकायदा इमारती कात्रीतचः रहिवाशांचे जीव पणाला

## भिवंडीत चार मजली इमारत कोसळली; ३ ठार, ८ जखमी



**ठाणे- भिवंडीतील ताहिर बिजनोर ही तीन मजली इमारत कोसळून तिघांचा मृत्यू झाला. तर, किसननगरातील विजय निवास या इमारतीचा स्लॅब कोसळून एक वृद्धाचा मृत्यू ओढावला. दोन्ही इमारती अनधिकृत आणि धोकादायक होत्या. अशा इमारतींसाठी ठाण्यात क्लस्टर डेव्हलपमेंट धोरण जाहीर केले असले तरी जिल्ह्याच्या उर्वरित शहरांमधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी सरकारने कोणतेही धोरण जाहीर केलेले नाही. ठाणे शहराला आणि उर्वरित जिल्ह्याला वेगळा न्याय का, असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.**

ठाणे आणि सभोवतालच्या शहरातील ८० आणि ९०च्या दशकात सर्वाधिक बेकायदा इमारती उभ्या राहिल्या. जागा दिसेल तिथे इमारती उभारताना निकृष्ट दर्जाच्या बांधकाम साहित्याचा वापर आणि इमारत उभारणीचे शास्त्रच पायदळी तुडवण्यात आले. त्यामुळे २५-३० वर्षांतच या इमारती अखेरच्या घटका मोजू लागल्या आहेत. इमारत उभारताना प्रचलित निकषांपेक्षा तीन ते चार पट जास्त एफएसआय वापरला आहे. त्याच्या दुप्पट एफएसआय मिळाला तरच इमारतींची पुनर्बांधणी व्यवहार्य होते. परंतु, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत तशा वाढीव एफएसआयची तरतूद नाही. ठाणे शहरासाठी क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून चार एफएसआय मंजूर करत इथल्या बेकायदा इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग सरकारने मोकळा केला आहे. परंतु, उर्वरित शहरांसाठी तशी कोणतीही योजना नसल्याने या इमारतींचा पुनर्विकास होऊच शकत नाही. त्यामुळे लाखो रहिवाशांना जीव मुठीत धरूनच वास्तव्य करावे लागत आहे.

बेकायदा इमारतीत राहण्याची आम्हाला हौस नव्हती. परंतु, मध्यमवर्गीय माणसाला अधिकृत इमारतींमधली महागडी घरे घेणे शक्य नसल्याने या बेकायदा इमारतीचा आसरा घ्यावा लागला. या घरांची स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशन सरकारने करून महसूल मिळविला आहे. पालिका त्यांच्याकडून प्रॉपर्टी टॅक्स, पाणीपट्टी वसूल करते. भूमाफिया, बिल्डर आणि तत्कालिन सरकारी अधिकाऱ्यांनी संगनमत करून उभारलेल्या या इमारती घरे विकून बक्कळ पैसा कमावला. ही सारी मंडळी आता नामानिराळी झाली असून रहिवासी मात्र गोत्यात आले आहेत. त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने सर्व शहरांसाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना राबवायला हवी, अशी या इमारतीतल्या रहिवाशांची मागणी आहे.

**पाच हजार धोकादायक इमारती**

जिल्ह्यातील महापालिका क्षेत्रांमध्ये सुमारे ५ हजार अतिधोकादायक आाणि धोकादायक इमारतींचे जाळे पसरले आहे. त्यात ६८३ अतिधोकादायक तर ४२८० धोकादायक इमारती आहेत. भिवंडीत सर्वाधिक अतिधोकादायक इमारती असून धोकादायक इमारतींमध्ये ठाणे आघाडीवर आहे. नवी मुंबईत एकही अतिधोकादायक इमारत नसली तरी धोकादायक इमारतींचा आकडा तेथे शंभरापार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने काही महिन्यांपूर्वी संकलित केलेल्या माहितीतून ही आकडेवारी पुढे आली होती. त्यात सातत्याने वाढ होत आहे.

**सरकारची दिशाभूल**

३१ डिसेंबर, २०१५पूर्वी झालेली अनधिकृत बांधकामे दंड आकारून नियमित करण्याची घोषणा सरकारने केली आहे. मात्र, या धोरणाच्या माध्यमातून सरसकट सर्वच अनधिकृत बांधकामे नियमित होणार नसून केवळ खासगी भूखंडांवर उभारलेली बांधकामेच नियमित होणार आहेत. तसेच, बांधकाम अधिकृत केले तरी त्यांच्या पुनर्विकासासाठी आवश्यक असलेल्या धोरणांमध्ये कोणतेही बदल सरकारने केलेले नाहीत. त्यामुळे सरकारची घोषणेतून रहिवाशांना फारसा दिलासा मिळण्याची चिन्हे नाहीत. उल्हासनगरचा अनुभव पाहता दंड आकारून इमारत नियमित करण्यासही कुणी पुढाकार घेईल की नाही, याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

# तुर्भेतील रस्ते गॅरेजचालकांकडून गिळंकृत

## मायलेकीच्या मृत्यूनंतरही पालिका, पोलिसांची डोळेझाक

**ठाणे-बेलापूर मार्गावर तुर्भे नाका परिसरात गॅरेज आणि फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. पदपथ आणि रस्ता अतिक्रमणांनी अडवल्यामुळे नागरिकांना चालणेदेखील जिकिरीचे झाले आहे. अतिक्रमणे हटवून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी रहिवासी आणि वाहनचालक करत आहेत.**



तुर्भे नाका परिसरात वर्षभरापूर्वी रस्ता ओलांडताना माय-लेकीचा आपघाती मृत्यू झाला होता. त्यांनतर नागरिकांच्या असंतोषाचा उद्रेक झाला. तेव्हा तात्पुरती कारवाई करण्यात आली, मात्र वाहतूक पोलीस आणि पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे पुन्हा वाहनांची गर्दी झाली आहे. येथील पेट्रोल पंपापासून तुर्भे नाका उड्डाणपुलापर्यंत रस्त्यांच्या कडेला असणारी दुकाने, फेरीवाले, गॅरेजचालक यांनी या रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. पदपथ आणि अरुंद रस्त्यावर रिक्षा, दुचाकी, दुरुस्तीच्या आणि वेल्डिंग मशीनच्या दुकानांनी बस्तान मांडले आहे. जेसीबी आणि मोठी वाहने उभी असतात. तर संध्याकाळी आंबेडकर चौक ते तुर्भे वाहतूक पोलीस चौकीपर्यंत फेरीवाल्यांची गर्दी असते.

वर्षभरापूर्वी अरुंद रस्ता ओलांडताना माय-लेकीचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यांनतर या ठिकाणी गतिरोधक बसवण्यात आले. दुकाने व गॅरेजचालकांवरही कारवाई करण्यात आली, त्यांनतर पुन्हा या ठिकाणी अतिक्रमण वाढले आहे. हॉटेल, गॅरेजचालक, फेरीवाले यांनी मिळेल तेवढी जागा बळकावली आहे.

'सविता केमिकल' नजीक एमआयडीसीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक पोलीस अवजड वाहनांवर कारवाई करतात, मात्र या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीस पुढे सरसावत नाहीत. माय-लेकीच्या मृत्यूनंतरही वाहतूक पोलीस आणि पालिका प्रशासनाला वाहतूक कोंडी आणि अपघातांचे गांभीर्य नसल्याचा आरोप रहिवासी करत आहेत. एका नगरसेवकाचे कार्यालय या रस्त्यावरच आहे. त्यांची वाहने या रस्त्यालगत उभी असतात.

***सहा पदरी रस्ता आहे कुठे?***

माजी पालकमंत्री गणेश नाईक यांच्या कारकीर्दीत ठाणे-बेलापूर मार्ग सहा पदरी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले होते. त्यापैकी तुर्भे आणि दिघा परिसराचा रस्ता अतिक्रमणामुळे सहा पदरी करण्यात आला नाही. माजी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारकीर्दीत दिघा येथील रस्त्यावरील अतिक्रमण हटवून हा रस्ता सहा पदरी करण्यात आला. मात्र तुर्भे स्टोअर परिसरचा रस्ता आजही गॅरेजवाले आणि दुकांनाच्या अतिक्रमणामुळे सहा पदरी झालेला नाही. राजकीय वरदहस्तामुळे या ठिकाणाच्या दुकानांवर कारवाई होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# सिडकोच्या भूखंडावर फेरीवाल्यांचे बस्तान!



**नवी मुंबई** - शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय नवी मुंबई महापालिकेने घेतला असताना दुसरीकडे नेरुळ डेपोसमोरील सेक्टर २९ मधील सिडकोच्या भूखंड क्रमांक ११ आणि १२वर बेकायदा मंडई थाटण्यात आली आहे. काही राजकीय नेते व्यवसाय करू देण्यासाठी या फेरीवाल्यांकडून पैसे उकळत असल्याचा आरोप, काही फेरीवाल्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर केला आहे. त्यामुळे शहरात फेरीवाल्यांकडून हप्तेवसुली होत असल्याची चर्चा सुरू आहे.

नेरुळ स्थानकाच्या बाजूला अभ्युदय बँकेच्या समोर असलेल्या पदपथावर पूर्वी मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत. पालिकेने वारंवार कारवाई केल्यानंतर नेरुळ डेपोसमोर असलेल्या सेक्टर २९ मधील भूखंड क्रमांक ११ आणि १२वर ते व्यवसाय करू लागले. राजकीय वरदहस्तामुळे त्यांचा व्यवसाय सुरू असल्याची चर्चा आहे. मूळ परवानाधारक फेरीवाल्यांचा आधार घेत विविध राजकीय पक्षांच्या हस्तक्षेपातून येथे विनापरवाना फेरीवाल्यांनाही जागा वाटून देण्यात आल्या आहेत. जागेच्या भाड्याच्या नावाखाली या बेकायदा फेरीवाल्यांकडून मोठ्या प्रमाणात हप्ता वसुली केली जात आहे. एका फेरीवाल्याकडून महिन्याला ३००० रुपये घेतले जात असल्याचे नाव न सांगण्याच्या अटीवर फेरीवाल्यांनी सांगितले. फक्त ७५ ते ८० फेरीवाले परवानाधारक असताना आता येथे ४००पेक्षा अधिक फेरीवाले आले कोठून, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

भूखंडावर कापडी शेड टाकून व्यवसाय केला जात आहे. परवानाधारक फेरीवाल्यांनी याच ठिकाणी 'नेरुळ रोजबाजार व्यापारी संस्था' स्थापन केली आहे. या संस्थेचे लेखापरीक्षणही केले जाते. फेरीवाल्यांना नियमानुसार जागा मिळावी, यासाठी संस्था सिडकोकडे पाठपुरावा करत असताना बेकायदा फेरीवाल्यांची संख्या परवानाधारक फेरीवाल्यांपेक्षा अधिक आहे.

# पुढील आठ दिवस ठाण्यावर पाणीसंकट



**ठाणे** - ठाणे तसेच मुंबई महापालिकेस पाणी पुरवठा करणाऱ्या भातसा नदीवरील पीसे येथील बंधाऱ्याच्या देखभाल दुरुस्तीचे तातडीचे काम हाती घेण्यात आल्याने पुढील आठ दिवस संपुर्ण ठाणे शहराला कमी दाबाने पाणी पुरवठा केला जाणार आहे.

पिसे बंधाऱ्याची जलसाठवण क्षमता वाढवण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने लहानमोठी कामे सुरू आहेत. आज, शनिवारपासून अशाच पद्धतीची कामे हाती घेण्यात येणार असल्याने या बंधाऱ्यातील पाण्याची पातळी कमी करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील आठ दिवस ठाणे शहराला कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे, अशी माहिती महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी महेश राजदेरकर यांनी दिली. या काळात कोणत्याही भागात पाणीपुरवठा बंद केला जाणार नाही. केवळ कमी दाबाने पाणी पुरवठा होईल, असेही राजदेरकर यांनी स्पष्ट केले. या काळात नागरिकांनी जपून पाणी वापरावे, तसेच साठवणुकीचे योग्य नियोजन करावे, असे आवाहन पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात आले आहे.

# तापमानवाढीमुळे मानवजातीच्या उच्चाटनाचा धोका



**लंडनहून चालवल्या जाणाऱ्या हाँगकाँग व शांघाय बँक या आंतरराष्ट्रीय कंपनीने जाहीर केले की, तापमानवाढीमुळे मानवजातीच्या उच्चाटनाचा धोका निर्माण झाल्यामुळे ते औष्णिक विद्युत म्हणजे कोळशापासून वीजनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांना व कोळसा खाणींना यापुढे अर्थपुरवठा करणार नाहीत.**

अलिकडे काही वर्षांपर्यंत पर्यावरणाबद्दल तुच्छता बाळगणाऱ्या वित्तीय संस्थांना आपला उन्माद सोडून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पाऊल उचलण्याची सद्बुद्धी होत आहे. हे चांगले लक्षण आहे.

अमेरिकेतील 'कॅलिफोर्निया' हे राज्य ५० वर्षांपूर्वी देशातील सर्वात हिरवा भाग म्हणून ओळखले जात होते. मात्र गेली सहा - सात वर्षे तेथे अवर्षण आहे. बराक ओबामा यांनी दोन वर्षांपूर्वी, कॅलिफोर्नियाचे होत असलेले वाळवंटीकरण हा तापमानवाढीचा परिणाम आहे असे मान्य केले. काही दिवसांपूर्वी जर्मनीतील बॉन येथे झालेल्या तापमानवाढीबाबतच्या जागतिक परिषदेत अमेरिकेतील कॅलिफोर्नियासह २० राज्यांनी अमेरिकन सरकारच्या विरोधात जाऊन युनोला आश्वासन दिले की ते कार्बन उत्सर्जन न करणारी अर्थव्यवस्था आणतील.

अर्थात प्रचलित यंत्राधारित उर्जाग्राही जीवनशैली व औद्योगिकरण सोडल्याखेरीज ते शक्य नाही. मात्र यातुन तथाकथित आधुनिक जगाला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येत आहे हे दिसते.

पण एव्हढ्याने भागणार नाही. तेल हा सर्वात मोठा कार्बन उत्सर्जन करणारा घटक आहे. एकूण वार्षिक १००० कोटी टन उत्सर्जनात वाहनांनी (कार, विमान इ.) जाळलेल्या इंधनाचा वाटा ४५० कोटी टन आहे. हे पेट्रोल व डिझेल, तेल शुध्दीकरण कारखान्याद्वारे कच्च्या तेलावर प्रक्रिया केल्यावर मिळते. हा तेल शुध्दीकरण कारखाना ( रिफायनरी ) स्वतः कार्बन उत्सर्जन करतो ते वेगळे. शिवाय प्लास्टिक सारखी शेकडो वर्षे विघटन न होणारी उत्पादने, बेंन्झिनसारखी अनेक घातक द्रव्ये बनवण्यास तो कारण ठरतो. त्यामुळे भयंकर प्रदूषण होते. जीवसृष्टी नष्ट होते.

**तीन मुख्य कारणांमुळे वरील उपाययोजना पुरेशा नाहीत.**

१) अकार्बनी प्रदूषणरहित उर्जास्रोतांकडे वळायला आता वेळ (फक्त ५ वर्षे) उपलब्ध नाही.

२) अशी ऊर्जा मिळविण्यासाठी देखील कार्बन उत्सर्जन करणारी खनिज इंधने जाळावी लागणार.

३) शेवटी कोणतीही ऊर्जा वापरली तरी ती जे काय करणार, जिथे वापरली जाणार, म्हणजे अर्थव्यवस्थेसाठी वस्तुनिर्मिती करणार, त्यामुळे जंगल, नदी, सागरातील, कार्बन शोषून घेणारे हरितद्रव्य नष्ट होणार. म्हणून कार्बन कमी करणारी वा न करणारी अर्थव्यवस्था वाचवू शकणार नाही तर अर्थव्यवस्था ही कल्पनाच सोडावी लागेल. कारण ती पृथ्वीच्या विरोधात वागते. मनाच्या कृत्रिम घडणीमुळे आधुनिक म्हणवणारी माणसे हे समजू शकत नाहीत. आता वातावरणातील कार्बनच्या पातळीने असे प्रमाण ओलांडले आहे की, आता असलेला कार्बन (६०० ते १००० वर्षे वातावरणात राहतो) तापमान वाढवत ठेवून मानवजातीला नष्ट करण्यास पुरेसा आहे.

म्हणजे केवळ उत्सर्जनात कपात करून भागणार नाही, तर ते थांबवावे लागेल व त्याचवेळी कार्बन शोषणारे जंगल, नदी, सागरातील हरितद्रव्य वाढावे लागेल. हे औद्योगिकरण व शहरीकरण थांबले तरच शक्य आहे.

आधुनिकतेच्या बेगडी कल्पना दूर सारून जीवनशैली २५० वर्षांपूर्वी होती तशी ऊर्जाविरहित व पृथ्वीशी सुसंगत झाली तरच हे शक्य आहे. नेमकी ही गोष्ट बँका व इतर अर्थसंस्था करणार नाहीत. कारण हा निष्कर्ष त्यांच्या मुळावर येतो. आणि त्यांचे हे सत्य लपवणे मानवजातीच्या व जीवसृष्टीच्या मुळावर येत आहे. ङकाय हवे ? बँका, उद्योग, नोकरी, पगार, त्यातुन मिळणारी जीवनशैली की प्रत्यक्ष जीवन.

***निवडीसाठी फार थोडा, पाच - दहा वर्षांचा वेळ उपलब्ध आहे.***

***'राजापूर रिफायनरी रद्द करा.पॅरिस करार पाळा मानवजात वाचवा.'***

**– ॲड. गिरीश राऊत**

# सिद्धार्थनगरचे पुनर्वसन लवकर करा

## विकासकाने दिले नाही दीड वर्षाचे भाडे




**मुंबई : गोरेगावच्या सिद्धार्थनगर (672, पत्रा चाळ) मधील रहिवाशांची घरे बांधून पूर्ण होण्याआधी तेथील अन्य इमारतींच्या बांधकामाला परवानगी कोणी व का दिली, असा सवाल करतानाच, रहिवाशांचे एक ते दीड वर्षाचे भाडे विकासकाने न दिल्याबद्दलची तक्रार सिद्धार्थनगर गृहनिर्माण सहकारी संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**

तेथील मूळ रहिवाशांना त्यांची घरे विकासकाने आधी बांधून द्यावीत त्यानंतरच अन्य इमारतींच्या बांधकामांना पुढील परवानगी द्यावी, अशी मागणी संस्थेने मुख्यमंत्र्यांकडे केली. सध्या या इमारतींचे आठ मजल्यांचे बांधकाम बाहेरून झाले आहे. ते लवकरात लवकर पूर्ण व्हावे, अशी रहिवाशांची इच्छा आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने या प्रकल्पाचे बांधकाम २०११ साली सुरू झाले होते, ते अद्याप पूर्ण झालेले नाही.

घरे रिकामी करून अन्यत्र राहण्यास गेलेल्या रहिवाशांना विकासकाने दीड वर्षापासून भाडे दिले नसल्याने लोकांची आर्थिक अडचण होत असल्याची बाबही संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक पी.वाय. शिंदे यांनी निदर्शनास आणून दिली.

मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात बोलावलेल्या बैठकीस संस्थेचे पदाधिकारी, उद्योगमंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री विद्या ठाकूर, गृहनिर्माण विभागाचे तसेच म्हाडाचे अधिकारी तसेच विकासक गुरू आशिषचे पदाधिकारी व युनियन बँकेचे अधिकारी उपस्थित होते. सिद्धार्थनगरच्या बांधकामाबाबत चुकीची माहिती देणाऱ्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

सिद्धार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्था, गुरू आशिष कन्स्ट्रक्शन व म्हाडा यांच्यात २००८ साली त्रिपक्षीय करार झाला. त्या वेळी ४२ एकरच्या भूखंडावर विकासकाने सर्वात आधी भाडेकरूंना घरे बांधून द्यावीत, त्यानंतर म्हाडाची ठरलेली घरे बांधावीत आणि मगच विकासकाने त्याच्या वाट्याला आलेल्या जागेवर बांधकाम करावे, असे ठरले होते. मात्र रहिवाशांची घरे तसेच म्हाडाची घरे यांचे बांधकाम रखडले असताना, अन्य बांधकामांना सीसी कशी देण्यात आली, असा सवाल मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आला. ती बांधकामे बंद करावीत, अशी संस्थेची मागणी आहे.

त्रिपक्षीय करारानंतर २००८ ते २०११ या काळात रहिवाशांनी टप्प्याटप्प्याने घरे रिकामी केली. तेव्हा रहिवाशांना घरभाड्यापोटी दरमहा १८ हजार रुपये मिळत होते आणि नंतर ते वाढत जात दरमहा ४० हजार रुपये झाले. मात्र दीड वर्षापासून भाडे वेळेवर न मिळणे, काहींचे अजिबात न मिळणे यामुळे रहिवासी संत्रस्त झाले आहेत. सुमारे ८० टक्के लोकांना भाडे मिळालेले नाही, असे संस्थेचे मार्गदर्शक पी.वाय. शिंदे यांनी सांगितले.

# हाफीजच्या सुटकेवरून अमेरिका संतप्त!

## पाकिस्तानला बिगर-नाटो मित्र देशातून वगळण्याची मागणी

**वॉशिंग्टन – पाकिस्तानला बिगर-नाटो मित्रदेशाचा देण्यात आलेला दर्जा रद्द करावा, अशी विनंती अमेरिकेतील दहशतवाद प्रतिबंधक क्षेत्रातील एका उच्चपदस्थ तज्ज्ञाने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाला केली आहे. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार आणि बंदी घालण्यात आलेल्या जमात-ऊद-दावचा म्होरक्या हाफीज सईद याची लाहोर न्यायालयाने नजरकैदेतून सुटका केल्यानंतर ट्रम्प प्रशासनाला वरील विनंती करण्यात आली आहे.**

दहशतवादी कृत्यांमधील सहभागाबाबत हाफीज सईदवर अमेरिकेने १० दशलक्ष डॉलरचे इनाम जाहीर केले होते, जानेवारी महिन्यापासून सईद नजरकैदेत होता. संयुक्त राष्ट्रसंघ आणि अमेरिकेने सईदला दहशतवाद्यांचा म्होरक्या जाहीर केले होते. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यास नऊ वर्षे लोटली तरीही अद्याप सईदवर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे पाकिस्तानला देण्यात आलेला बिगर-नाटो मित्रदेशाचा दर्जा रद्द करण्याची वेळ आली आहे, असे ब्रूस रिडेल या दहशतवाद प्रतिबंधक क्षेत्रातील उच्चपदस्थ तज्ज्ञाने केली आहे.

**हाफीज मोकळा**

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार आणि बंदी घालण्यात आलेल्या जमात-ऊद-दावा या संघटनेचा म्होरक्या हाफीज सईद याला पाकिस्तान सरकारने अन्य कोणत्याही प्रकरणांत जखडून ठेवले नाही तर तो गुरुवारी मध्यरात्रीपासून मुक्तपणे संचार करू शकणार आहे, असे त्याच्या वकिलांनी सांगितले. लाहोर उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचा समावेश असलेल्या पंजाब प्रांताच्या न्यायिक आढावा मंडळाने बुधवारी ३० दिवसांच्या



नजरकैदेची मुदत संपल्याने सईदच्या सुटकेचा एकमताने निर्णय दिला. पाकिस्तान सरकारने त्याला अन्य कोणत्याही खटल्यात जखडून ठेवले नाही तर सईद मुक्तपणे संचार करू शकणार आहे. त्यामुळे पंजाब सरकार त्याला अन्य खटल्यांत नजरकैदेत ठेवेल, अशी भीती आम्हाला वाटत असल्याचे सईदचे वकील ए. के. डोगर यांनी सांगितले.

# अधिवेशनावर बहिष्कार

## ११ डिसेंबरला विदर्भ बंद

**बुलडाणा –** वेगळ्या विदर्भाचे आश्वासन देणाऱ्या भाजपा सरकारची नीती 'मुंह मे राम और बगल में छुरी' या वाक्प्रचारासारखी चुनावी जुमला ठरली आहे. २०१४च्या निवडणुकीत वेगळा विदर्भ राज्याची निर्मिती करण्याचे आश्वासन भाजपाच्या नेत्यांनी दिले होते. मात्र, आता ते आपले शब्द फिरवीत आहेत. त्यामुळे वेगळ्या विदर्भाच्या लढ्यासाठी पुकारलेल्या जनआंदोलनात सर्व विदर्भवासीयांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विदर्भ आंदोलन समितीचे नेते माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी केले आहे.



स्वतंत्र विदर्भासह व शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी ११ डिसेंबर रोजी विदर्भ आंदोलन समितीच्यावतीने विदर्भ बंदची हाक देण्यात आली आहे. या आंदोलनाला जनाधार निर्माण करण्यासाठी बुधवारी ॲड. वामनराव चटप यांच्या उपस्थितीत बुलडाण्यात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यानंतर आयोजित पत्रपरिषदेत त्यांनी हे आवाहन केले. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनावर बहिष्कार टाकत येत्या ११ डिसेंबर रोजी विदर्भ बंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती देत आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यासाठी शाळा, महाविद्यालये बंद ठेवणे, व्यापारी प्रतिष्ठाणे बंद राहावीत, यासाठी विविध संस्था संघटनांशी चर्चा सुरू आहे.

त्याला अनेकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून विदर्भाच्या मुद्यावर काम करणाऱ्या सर्व छोट्या-मोठ्या संघटना या आंदोलनात सहभागी होतील, अशी घोषणाही चटप यांनी केली. विदर्भातील जनतेने स्वयंस्फुर्तीने या आंदोलनात सहभागी होऊन सरकारवर दबाव निर्माण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

**गडकरींचे वक्तव्य म्हणजे पळवाट!**

वेगळ्या विदर्भाच्या मुद्यावरून सत्ताधारी भाजपवर प्रखर टीका करीत चटप पुढे म्हणाले, निवडणुकीपूर्वी नितिन गडकरी यांनी वेगळा विदर्भ राज्य करण्याचे लिहून दिले होते. आता मात्र, 'हा प्रदेश सक्षम झाल्यावर वेगळा विदर्भ करू' असे वक्तव्य त्यांनी केले आहे. गडकरींचे वक्तव्य ही निव्वळ पळवाट असून त्यांची राजकीय इच्छाशक्ती कमी पडत आहे, असा आरोप ॲड. वामनराव चटप यांनी यावेळी केला. आज संसदेत भाजपाजवळ बहुमत आहे. त्यांनी ठरविल्यास विदर्भ राज्याचा ठराव सहज पारित होऊ शकतो. मात्र, पंतप्रधान मोदींसमोर कुणाचेही काही चालत नाही, असा उपरोधिक टोला मारत विदर्भासाठीचे आंदोलन तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला.

## इजिप्तमधील मशिदीवर दहशतवादी हल्ला

# २३५ जणांचा मृत्यू, 100 जखमी

इजिप्तमधील उत्तर सिनाई प्रांतातील मशिदीवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २३५ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात जवळपास १०० जण जखमी झाले आहेत. अल-अरिश शहरातील रवाडा मशिदीवर दहशतवाद्यांनी नमाजावेळी बॉम्बहल्ला केला. त्यावेळी मशिदीत मोठी गर्दी होती. यानंतर दहशतवाद्यांनी मशिदीतील लोकांवर अंदाधुंद गोळीबार सुरु केला.

उत्तर सिनाई हा इजिप्तमधील अशांत प्रांत म्हणून ओळखला जातो. या भागाच्या पश्चिमेला साधारणत: ४० किलोमीटर अंतरावर रवाडा मशीद आहे. या मशिदीत नमाज सुरु असताना दहशतवाद्यांनी बॉम्बहल्ला केला. यामध्ये २३५ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती अल-अहराम या सरकारी वर्तमानपत्राच्या संकेतस्थळाने दिली. दहशतवाद्यांच्या बॉम्बहल्ल्यात आणि गोळीबारात जवळपास १०० जण जखमी आले आहेत.

उत्तर सिनाई प्रांत दहशतवादी हल्ल्याने हादरल्यावर इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतह अल सीसी यांनी तातडीची बैठक बोलावली.





इजिप्तचे सैन्य उत्तर सिनाई प्रांतात आयसिस या दहशतवादी संघटनेविरोधात धडक कारवाई करत असताना हा हल्ला झाला. या भागात आधीही दहशतवाद्यांनी शेकडो पोलीस कर्मचारी आणि सैनिकांच्या हत्या केल्या आहेत. याशिवाय प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या नागरिकांच्याही आयसिसच्या दहशतवाद्यांकडून क्रूर हत्या करण्यात आल्या आहेत.

# आरएसएस आगीशी खेळतोय!: ओवेसी

**हैदराबाद –** 'राम मंदिराच्या मुद्द्यावर वारंवार वक्तव्य करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप देशात भीतीचं वातावरण निर्माण करत आहेत. गुजरात निवडणुकीतील फायद्यासाठी हे सगळं सुरू आहे. असं करून संघ आगीशी खेळतोय,' असा पलटवार एमआयएमचे नेते खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी केला आहे.

अयोध्येतील रामजन्मभूमीवर मंदिरच होणार, दुसरं-तिसरं काही नाही, असं वक्तव्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी काल कर्नाटकातील उडुपी इथं सुरू



असलेल्या धर्मसंसदेत बोलताना केलं होतं. भागवतांच्या या वक्तव्याला ओवेसी यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. अयोध्या प्रकरणावर ५ डिसेंबरपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. मात्र, संघ व भाजप त्याआधीच भीतीचं वातावरण निर्माण करू पाहत आहेत. भागवत हे न्यायालयावर दबाव टाकू पाहत आहेत. त्यांचं वक्तव्य देश हिताच्या दृष्टीनं घातक आहे. सर्वोच्च न्यायालय याची योग्य ती दखल घेईल,' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

'राम मंदिर हा संवेदनशील विषय आहे. त्यावर नको ती वक्तव्य करून संघ आगीशी खेळ करतोय. गुजरात आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपसाठी पोषक वातावरण तयार करण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालय भावनेच्या भरात नव्हे तर साक्षीपुराव्याच्या आधारावर निर्णय घेईल,' असा विश्वासही ओवेसी यांनी व्यक्त केला.

# आदीवासी वस्तीगृहातील जेवणात आळ्या

## विद्यार्थांचे अन्नत्याग आंदोलन

**कल्याण -** शहराच्या पश्चिम भागातील बिर्ला कॉलेजनजीक सरकारी आदिवासी विद्यार्थी वस्तीगृह आहे. या वस्तीगृहातील विद्यार्थांना दिले जाणाऱ्या जेवणात आळ्या आढळून आल्याची तक्रार विद्यार्थांनी केली आहे. वस्तीगृहाला जेवण पुरविणा:या कंत्रटदाराच्या



विरोधात कारवाई करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थांनी अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. या प्रकरणी विद्यार्थांनी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली आहे. जेवण पुरविणा:या कंत्रटदाराला नोटिस बजावण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

अखिल भारतीय मानव अधिकार युनियन

सभासद नोंदणी सुरु

अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०११११०

सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

# 'गळाभेट कामी आली नाही'; हाफिज सईदच्या सुटकेवरुन राहुल गांधींचा मोदींवर निशाणा

मुंबईवरील २६/११ हल्ल्याचा मास्टरमाईंड हाफिद सईदची नजरकैदेतून सुटका झाली. यावरुन काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. 'नरेंद्र भाई, गळाभेट कामी आली नाही,' अशा शब्दांमध्ये राहुल गांधींनी मोदींना लक्ष्य केले. पंतप्रधान मोदींनी अमेरिका दौऱ्यात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची गळाभेट घेतली होती. यावरुनच राहुल यांनी मोदींना टोला लगावला.

'नरेंद्र भाई, गळाभेटीने काहीही साध्य झाले नाही. दहशतवादाचा



मास्टरमाईंड मोकाटच आहे. ट्रम्प यांनी पाकिस्तान सैन्याला लष्कर फंडिंगबाबतही क्लीनचीट दिली आहे. त्यामुळे आता मोदी आणि ट्रम्प यांच्या आणखी गळाभेटी घेण्याची आवश्यकता आहे,' असे ट्विट करुन राहुल गांधींनी मोदींना चिमटा काढला.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)